जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १४ | शनिवार, १९ जुलै २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी प्रकाश जगताप विराजमान

## हवेलीतील दोन्ही बड्या सहकारी संस्थावर सख्खे भाऊ प्रमुख पदावर

**पुणे, ता. १८ :** आशिया खंडातील सर्वात मोठी समजल्या जाणाऱ्या व राजकीय खेळीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी प्रकाश चंद्रकांत जगताप यांची अपेक्षेप्रमाणे बिनविरोध निवड झाली. बाजार समिती व यशवंत सहकारी साखर कारखाना या हवेली तालुक्यातील दोन महत्वाच्या सहकारी संस्थावर सख्खे भाऊ प्रमुख पदावर असल्याचा अनोखा योग आला आहे.

मावळते सभापती दिलीप दादा काळभोर यांनी सभापती पदाचा राजीनामा दिल्याने बाजार समितीच्या सभागृहात शुक्रवारी (ता.१८) सहकार उपजिल्हा निबंधक प्रकाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या निवडणूक प्रक्रियेत सभापती पदासाठी प्रकाश जगताप यांचा एकमेव अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. दरम्यान, ही निवडणूक



बिनविरोध पार पाडण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा भाजपचे पुणे (उत्तर) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद व दौंडचे आमदार राहुल कुल या दोघांनी प्रमुख भूमिका बजावल्याचे समजत आहे.

यावेळी माजी सभापती दिलीप काळभोर, उपसभापती दत्तात्रय पायगुडे, संचालक रोहिदास उंद्रे, रामकृष्ण सातव, राजाराम कांचन, सुदर्शन चौधरी, शशिकांत गायकवाड, प्रशांत काळभोर, नितीन दांगट, गणेश घुले, रवींद्र कंद, मनिषा हरपळे, सारिका हरगुडे, आबासाहेब आबनावे, गणेश घुले व अनिरुध्द भोसले, संतोष नांगरे संतोष आबासाहेब कांचन यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी नुकताच सभापतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर तालुक्यातून सभापतीपदासाठी कोणाची वर्णी लागणार म्हणून हवेली तालुक्यातून चर्चेचा धुराळा उडाला होता. अगदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यापर्यंत हे पद मिळावे म्हणून तालुक्यातील नेत्यांची धावपळ सुरू होती. मात्र अखेर संचालक मंडळातील विद्यमान १२ संचालकांनी प्रकाश जगताप यांच्या पाठीमागे उभे राहून त्यांना सभापती करण्याचा मार्ग मोकळा केला. आज शुक्रवारी सभापतीपदासाठी केवळ प्रकाश जगताप यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची सभापतीपदी बिनविरोध निवड झाली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती २३ वर्षे प्रशासकीय राजवटीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया व सत्ताधारी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या माध्यमातून प्रादेशिक, पुणे जिल्हा रचना झाल्यानंतर हवेली तालुक्याच्या कार्यक्षेत्रात आणून निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी प्रकाश जगताप यांनी मुख्य भूमिका बजावली आहे.

पान २ वर

### दोघा भावांचीच तालुक्यावर पकड..

पुणे बाजार समिती व यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी दोन सख्खे भाऊ कारभार सांभाळणार म्हणून बाजार समितीच्या निवड प्रक्रिये आधीच तालुक्यात विरोधकांकडून मोठा गदारोळ सुरू करण्यात आला होता. हवेली तालुक्यात दोन सख्खे भाऊ दोन महत्वाचा संस्थांवर कशासाठी हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मात्र हा सर्व विरोध मोडून काढत जगताप यांनी आपणच सहकारामधील शिरोमणी असल्याचे दाखवून दिले आहे.

### यशवंत कारखान्याच्या जमीन खरेदीला बळ..

पुणे बाजार समितीच्या माध्यमातून यशवंत कारखान्याची जमीन खरेदी करून तालुक्यातील सहकारी संस्थेला नवसंजीवनी देण्याचा पहिला प्रयत्न सभापती प्रकाश जगताप यांनी मांडला होता. या निर्णयाला बाजार समितीच्या सर्व संचालक मंडळाने ठराव मंजूर करून पाठिंबा दिला आहे. राज्य शासनाकडून या जमिनविक्री प्रस्तावाला पणन विभागाच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे. या प्रस्तावाच्या विरोधात उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर नवनिर्वाचित सभापती प्रकाश जगताप निश्चित मार्ग काढतील. व यशवंत कारखान्याच्या जमीन खरेदीच्या प्रस्तावाला बळ देतील. अशी तालुक्यात चर्चा सुरु आहे.



## दीड लाख गोविंदांना विमा कवच; मुख्यमंत्र्यांचे क्रीडा विभागाला निर्देश

**मुंबई, ता. १८ :** गोविंदांना सरकारकडून मिळणाऱ्या विमाकवचात वाढ करून ते दीड लाख गोविंदांना देण्यात यावे, अशी मागणी करीत आज दहीहंडी समन्वय समितीने मंत्री ड. आशीष शेलार यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मकता दाखवत याबाबत क्रीडा विभागाला निर्दे श दिले आहेत.

राज्यसरकारने दहीहंडी या खेळाला साहसी दर्जा दिल्यापासून या खेळात गोविंदा पथकांचा सहभाग वाढला आहे आणि त्याचबरोबर खेळात सहभागी होणाऱ्या गोविंदांचा धोकाही वाढलेला आहे. सरकारने गेल्या दोन वर्षांपासून ७५ हजार गोविंदांसाठी विमाकवच देण्याचा निर्णय घेतलेला आहे. यंदा यामध्ये वाढ करून एक लाख ५० हजार गोविंदांना विमाकवच मिळावे, अशी म ागणी करीत शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. याबाबत क्रीडा विभागाला मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत.

शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण पडेलकर, गीता झगडे आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मंत्री आशीष शेलार यांनी त्यांचे आभार मानले.

गोविंदाचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास १० लाख रुपये, अपघातग्रस्त झाल्यास पाच लाख, अडीच लाख किंवा किरकोळ जखमी असेल तर एक लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळणार आहे.

## उरळगावात मध्यरात्री घरफोडीचा थरार; अडीच लाखांचा ऐवज पळवला

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १८ : शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उरळगाव (ता. शिरूर) परिसरातील आफळेवस्ती येथे अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून, महिलेला लोखंडी गजाने मारहाण केल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी (ता. १८) मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे. याप्रकरणी २ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना घडली. या जबरी घरफोडीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रकरणी मनिषा हरिदास आफळे (वय -२३, रा. उरळगाव-आफळेवस्ती, ता.शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, शिरूर पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनिषा आफळे यांचे पती कांद्याच्या वाहतुकीचे काम करतात. गुरुवारी रात्री गुलटेकडी (पुणे) येथे कांदा घेऊन गेले होते. घरात मनिषा आफळे त्यांच्या दोन लहान मुलांसह बेडरूममध्ये झोपल्या होत्या व त्यांची सासू दुसऱ्या खोलीत तर सासरे गोठ्यात झोपले होते.

मध्यरात्री तीन चोरांनी जोर-जोरात धक्के देऊन बेडरूमचा दरवाजा उघडला व घरात प्रवेश केला.त्यानंतर मनिषा आफळे यांना लोखंडी गजाने डोक्यावर मारहाण करून, कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम ६५ हजार रुपये असा २ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

तीन चोरांपैकी दोघांनी तोंडाला रूमाल बांधला होता व एकाने मास्क घातला होता.तिघांनीही काळ्या रंगाचे जर्किंग घातले होते. तसेच त्यांच्या हातात कोयता व लोखंडी गज होते. घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात येत आहेत.

दरम्यान, या घटनेत चोरांनी केलेल्या मारहाणीत मनिषा आफळे यांच्या डोक्याला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली असून त्यांच्यावर न्हावरे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शिर्डी रेल्वे मार्गासाठी २३९.८० कोटी मंजूर

**शिर्डी, ता. १८ :** शिर्डी रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्र सरकारने महाराष्ट्राला मोठी भेट दिली आहे. शिर्डी रेल्वे मार्गाच्या विकासासाठी केंद्र सरकारने २३९.८० कोटींचा निधी मंजुर केला आहे. या प्रकल्पामुळे शिर्डी येथील रेल्वे कनेक्टिव्हिटी तर सुधारेलच पण साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही मोठा दिलासा मिळेल. या रेल्वे मार्गामुळे प्रवास सुविधा अधिक सुलभ आणि जलद होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पांतर्गत रेल्वे लाईन्सचे आधुनिकीकरण, नवीन सुविधांचा विकास आणि प्रवासी सेवांमध्ये सुधारणा केली जाणार आहे. शिर्डी हे देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने या प्रकल्पाला विशेष महत्त्व आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्थानिक नागरिक आणि




साई भक्तांनी स्वागत केले आहे.

दरम्यान, हा प्रकल्प शिर्डीच्या रेल्वे स्टेशनला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज करेल, ज्यामुळे भाविकांना आणि पर्यटकांना उत्तम अनुभव मिळेल. केंद्र सरकारने मंजूर केलेल्या या निधीमुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळेल व लवकरच शिर्डी रेल्वे मार्गाचा कायापालट होईल. या प्रकल्पामुळे शिर्डीला देशातील इतर भागांशी अधिक चांगल्या प्रकारे जोडले जाईल, ज्यामुळे प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होईल.

## अल्पवयीन मुलाची तेरा वर्षाच्या मुलीला धमकी

**पुणे, ता. १८ :** शहरातील एका परिसरात अल्पवयीन मुलांकडून होणाऱ्या अयोग्य वागणुकीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. १५ वर्षांच्या एका मुलाने आपल्या ओळखीतील १३ वर्षांच्या मुलीला प्रपोज केले. मात्र तिने नकार दिल्यानंतर त्याने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आणि गंभीर धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

पीडित मुलीच्या आईने या संदर्भात पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, मे पासून हा त्रास सुरू असल्याचं तक्रारीत नमूद आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुलगा हा पीडित मुलीच्या ओळखीचा आहे. त्याने तिला एकदा जवळ बोलावून तिच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने तिला स्पष्टपणे सांगितले की, तू



माझी मैत्रीण हो नाहीतर मी कोणाचा तरी खून करून तुझं नाव घेईन, अशी धमकी दिली.

या प्रकरणात अधिक चिंतेची बाब म्हणजे त्यानंतर आरोपीने त्या मुलीला घराच्या मागील बाजूस बोलावून तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिला मानसिक तणाव व भीती अनुभवावी लागली. तिच्या आईने दाखल केलेल्या तक्रारीनुसार, या प्रकारामुळे तिच्या मुलीच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम झाला आहे.

या प्रकारावर कारवाई करत, पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलाविरुद्ध भारतीय दंड विधानातील संबंधित कलमांव्यतिरिक्त 'पोक्सो कायदा' बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अंतर्गतही गुन्हा नोंदवला आहे.

दरम्यान, आरोपी आणि पीडित मुलगी दोघेही अल्पवयीन असल्यामुळे त्यांच्या ओळखी गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत. पोलिस अधिक तपास करत असून, बालकल्याण समितीच्या देखरेखीखाली पुढील प्रक्रिया पार पाडली जात आहे.

## महाराष्ट्र पोलीस दलात ११ हजार जागांसाठी भरती होणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई, ता. १८ :** महाराष्ट्रात लवकरच ११ हजार पदांसाठी पोलीस भरती होणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केली. ही भरती प्रक्रिया महाराष्ट्र पोलीस दलातील रिक्त पदे भरण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच मनुष्यबळ वाढवण्याच्या उद्देशाने राबवली जाणार आहे.

यामध्ये पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक, राज्य राखीव पोलीस बल (ड्ळझक्र)आणि बँड्समन यासारख्या विविध पदांचा समावेश आहे. ही भरती ऑनलाइन अर्ज प्रक्रियेद्वारे होईल, ज्याची अधिकृत अधिसूचना लवकरच म हाराष्ट्र पोलीस संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे.

उमेदवारांना शारीरिक, लेखी आणि वैद्यकीय चाचण्या द्याव्या




लागतील. या भरतीमुळे राज्यातील बेरोजगार तरुणांना मोठी संधी उपलब्ध होईल, विशेषतः ग्रामीण भागातील उमेदवारांना. यापूर्वी २०२४ मध्ये १७, ४७१ पदांसाठी भरती जाहीर झाली होती, आणि आता हा नवा टप्पा पोलीस दलाला अधिक बळकट करेल.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेचे स्थानिक पातळीवर स्वागत होत असून, या भरती संबंधित अधिक माहिती मिळवण्यासाठी उमेदवारांनी अधिकृत पोर्टलवर लक्ष ठेवावे, असे आवाहन सरकारने केले आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक उमेदवार अर्ज ऑनलाइन पद्धतीने http://policerecruitment2024.mahait.org या अधिकृत पोर्टलवर भरू शकतात.

## टँकर चालकांच्या अडेलतट्टूपणामुळे पुणे सोलापूर महामार्गावर दोन तास वाहतूक कोंडी

**लोणी काळभोर, ता. १८ :** लोणी काळभोर (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील हिंदुस्थान पेट्रोलियम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या समोर टँकर उभे राहिल्यामुळे पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याचा प्रकार शुक्रवारी (ता. १८) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला आहे.

या टँकर चालकांच्या अडेलतट्टूपणामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तब्बल दोन तास वाहतूक कोंडीत अडकून मनस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे एचपी कंपनीच्या मुजोर टँकर चालकांवर कारवाई कधी होणार? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

लोणी काळभोर येथे इंडियन ऑईल व एचपीसीएल या दोन कंपनीचे तेल डेपो आहेत. या ठिकाणी



दिवसभरात ६०० हून अधिक टँकर इंधन भरण्यासाठी येत असतात. मात्र हे टँकर सेवारस्त्यावर पार्क अथवा तासंतास उभे केले जातात. त्यामुळे सेवा रस्ता पूर्ण बंद होतो. त्यामुळे या ठिकाणी नित्याचीच वाहतूक कोंडी होत असते. मात्र आजही एचपीसीएल कंपनीच्या बाहेर टँकर मोठ्या प्रमाणात उभे केले होते.

दरम्यान, जगदगुरू संत तुकोबांचा पालखी सोहळा आज शुक्रवारी याच मार्गावरून परतीचा प्रवास करीत होता. यावेळी पालखी सोहळ्याच्या दर्शनसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भाविक तुकोबांचे दर्शन घेऊन निरोप देत होते. मात्र टँकर चालकांनी सेवा रस्त्यावर अतिक्रमण केल्याने पुणे सोलापूर महामार्गावरील कवडीपाट टोलनाका ते थेऊर फाट्यापर्यंत वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. व वारकऱ्यांसह प्रवासी दोन तासांहून अधिक काळ वाहतूक कोंडीत अडकले होते.

**कारवाई कधी?**

इंडियन ऑईल व एचपीसीएल या दोन कंपन्यांचे टँकर चालक अनेक वर्षापासून सेवारस्त्यावरच टँकर पार्क करीत आहेत. मात्र वाहतूक विभागाकडून त्यांच्यावर कोणतीही कडक कारवाईचा बडगा उगारला नसल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच टँकर चालकांचे फावले आहे. अशी नागरिकांमध्ये जोरदार चर्चा रंगली आहे. या टँकर चालकांवर पोलीस प्रशासन कधी कारवाई करणार? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.


> लोणी काळभोर येथील इंडियन ऑईल व हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनींना वाहतूक विभागाच्या वतीने पहिल्यांदा सेवा रस्त्यावर गाड्या पार्क करू नये. अशा आशयाचे पत्र देण्यात येणार आहे. त्यांनी ऐकले तर ठीक नाहीतर त्यांना दुसऱ्यांदा सांगितले जाणार नाही. त्यांच्यावर थेट पोलीस प्रशासनाच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल.
>
> - **राजेंद्र करणकोट,** (पोलीस निरीक्षक - हडपसर वाहतूक विभाग)

# राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाडांविरोधात गुन्हा दाखल

## रात्रीच्या राड्यानंतर मुंबई पोलिसांची कारवाई

**मुंबई, ता. १८ :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात मुंबई पोलिसांनी गुरुवारी (ता. १७) विधान भवनात झालेल्या राड्यानंतर मरिन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

विधानभवनात सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. नितीन देशमुख यांना विधानभवनातून बाहेर घेऊन जात असताना जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे पोलिसांनी आव्हाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



विधानभवनाच्या इमारतीमध्ये आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख आणि पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले यांच्यात वाद झाला होता. या घटनेचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. नितीन देशमुख यांना मारहाण झाल्याचं आव्हाड यांनी म्हंटल आहे. मात्र, असे असतानाही रात्री उशिरा पोलिसांनी नितीन देशमुख यांनाच अटक केली. नितीन देशमुख यांना ताब्यात घेतल्याचे कळताच आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तातडीने विधानभवन गाठले. त्यांनी पोलिसांच्या कारवाईचा तीव्र शब्दांत निषेध केला. देशमुख यांना घेऊन जात असलेल्या पोलिसांच्या गाडीसमोर आव्हाडांनी आपल्या कार्यकर्त्यांसह ठिय्या आंदोलन केले. दरम्यान, परिस्थिती चिघळत असताना, आव्हाड थेट पोलिसांच्या गाडीखाली झोपले. यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करून त्यांना तिथून ओढून बाहेर काढले आणि देशमुख यांना घेऊन गेले.


# शेतकऱ्यांना चारपट मोबदला व १० टक्के विकसित भूखंड

## पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ भूसंपादन प्रक्रिया

**पुणे, ता. १८ :** मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीत पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाच्या मोबदल्याचे सूत्र निश्चित करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या एकूण जमिनीच्या १० टक्के विकसित भूखंड आणि सध्याच्या बाजारभावाच्या चारपट दराने रोखीचा मोबदला देण्याचा विचार करण्यात आला आहे. हे पॅकेज अंतिम झाले, तर विमानतळ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाला तातडीने सर्वेक्षण पूर्ण करून भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना दिल्या. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, विमानतळावर मोठ्या विमाने उतरू शकतील, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच विमानांच्या हँगरचीही आवश्यक ती व्यवस्था असावी, असे स्पष्ट केले.

सन २०१३ च्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कायद्यानुसार भूसंपादन करण्याचे ठरवण्यात आले होते. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी अधिसूचना जाहीर केली होती. मात्र, या कायद्यानुसार पुनर्वसनाची तरतूद नसल्यामुळे मोबदल्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारच्या पातळीवर होणे आवश्यक होते. त्यामुळे मुंबई येथे झालेल्या बैठकीत २०१९ च्या सुधारित कायद्यानुसार भूसंपादन करण्याचा निर्णय घेण्याबाबत चर्चा झाली.



या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी, तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष स्वाती पांडे उपस्थित होत्या.

कोणत्या गावांमध्ये होणार भूसंपादन? विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील एकूण २ हजार ६७३ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने यापूर्वी या गावांतील शेतकऱ्यांना नोटिसा बजावल्या होत्या आणि अडीच हजारांपेक्षा जास्त हरकती-सूचना प्राप्त झाल्या होत्या. या हरकतींची सुनावणी पूर्ण झाली आहे. काही शेतकऱ्यांनी विमानतळ प्रकल्पाला पाठिंबा दिला असून काहींनी विरोध दर्शवला आहे.

शेतकऱ्यांना काय मिळणार? सहमतीने जमीन देणाऱ्यांना त्यांच्या एकूण जमिनीच्या १० टक्के परतावा विकसित भूखंडाच्या स्वरूपात सध्याच्या बाजारभावाच्या ४ पट रकमेचा रोख मोबदला, प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांना विमानतळ आणि इतर प्रकल्पांमध्ये नोकरीची संधी

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले विमानतळासाठी भूसंपादन करायच्या जमिनीची संयुक्त मोजणी झाल्यानंतर प्रत्यक्षात किती मोबदला द्यावा लागणार, हे निश्चित होईल. दरम्यान, भूसंपादनाच्या सर्वेक्षणाची आणि संपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण केली जाईल.

# पुण्यात नाना नानी पार्कसमोर मद्यधुंद तरुणीचा राडा

**पुणे, ता. १८ :** पुण्यातील नाना नानी पार्कसमोर गुरुवारी सकाळी घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली. एका मद्यधुंद तरुणीने मुठा नदीत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांच्या वेळेवर केलेल्या हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पावसामुळे मुठा नदीचा प्रवाह वाढलेला असताना संबंधित तरुणी अचानक नदीपात्रात उतरली. ती माझी आई मला बोलावते आहे, असे ओरडत आत्महत्येचा प्रयत्न करत होती. तिच्या या वर्तनामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांनी पोलिसांना तत्काळ माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिला सुरक्षित बाहेर काढले. दरम्यान, ती महिला पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत होती आणि मुंब्रा येथील रहिवासी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. तिच्याकडून सुमारे मिनिटे नदीपात्रात गोंधळ घालण्यात आला. पावसाळ्यामुळे नदीचा प्रवाह प्रचंड वाढलेला असल्याने परिस्थिती अतिशय धोकादायक होती.

पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नेले असून पुढील चौकशी सुरू आहे. नशेतून घेतलेल्या या टोकाच्या पावलामुळे गंभीर परिणाम होऊ शकले असते, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकारामुळे नागरिकांनी मद्यपान व मानसिक आरोग्याबाबत अधिक सजग राहण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# कापूरहोळ येथे गळफास घेऊन एकाची आत्महत्या



**कापूरहोळ, ता. १८ :** येथील एका पडीक वसाहतीत तिसऱ्या मजल्यावर एका ४३ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (ता. १७) सायंकाळी उघडकीस आली. गणेश प्रकाश भोकरे (वय ४३, रा. भोईआळी, पौड, ता. मुळशी, जि. पुणे) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

सायंकाळी सात वाजताच्या सुमारास गावातील रहिवासी सय्यद हसन शेख यांना माहिती मिळाली की अमित कुमार यांच्या पडीक अपार्टमेंटमध्ये एक अनोळखी इसम गळफास घेऊन लटकलेला आहे. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांना कळवले.

पोलिसांनी घटनास्थळी येऊन ग्रामस्थांच्या मदतीने इसमाला खाली उतरवून उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटल, कापूरहोळ येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. घटनास्थळी तपास करताना मृताच्या खिशात आधारकार्ड सापडले असून त्यावरून ओळख पटली. याप्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस नाईक मदने करत आहेत.

# हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी प्रकाश जगताप विराजमान

**पान १ वरुन**

त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी दौंड चे आमदार राहुल कुल, जिल्हा बँकेचे संचालक प्रदिप कंद, विकास दांगट यांच्या अधिपत्याखाली राष्ट्रवादी (अजित पवार) गट, भाजप गट यांच्या सोबतीने या बाजार समितीवर सर्वपक्षीय पॅनेलची रचना करून सत्ता हस्तगत केली. मात्र त्यानंतर झालेल्या सभापतीपदाच्या बेबनावात पुढील सभापती हा सर्वपक्षीय नेते निवडीचा की भाजपचा म्हणून तालुक्यात चर्चेने जोर धरला होता. मात्र भाजपच्या वरिष्ठ नेतेमंडळींनी या निवड प्रक्रियेत जगताप यांना झुकते माप दिल्याची चर्चा आहे.

**खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीस मिळणार गती?**

पुणे बाजार समिती प्रमाणे हवेली तालुका खरेदी विक्री संघाची कायदेशीर निवडणूक प्रक्रिया पार पडावी म्हणून सभापती प्रकाश जगताप यांच्या समर्थकांनी जिल्हा सहकार उपनिबंधक यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. या तक्रारीमुळे हवेली तालुक्यात ५० वर्षे न झालेली निवडणूक होण्याची कार्यवाही अटळ बनली आहे. बाजार समिती, यशवंत कारखान्याप्रमाणे खरेदी संघाच्या निवडणूकीचे राजकारण जगताप बंधूच्या ग्लॅमर भोवती फिरणार असल्याचे बोलले जाते.

निवडीनंतर प्रकाश जगताप म्हणाले, शेतकऱ्यांचे हित सर्वाधिक प्राधान्याने जपले जाईल. बाजार समितीतील पारदर्शकता, शेतमालाच्या लिलावाची शुद्ध प्रक्रिया, आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा यासाठी कटीबद्ध राहू. शेतकऱ्यांना सुलभ सेवा देण्यासाठी डिजिटल यंत्रणा बळकट केली जाईल. तसेच नवीन गोडाऊन, पार्किंग आणि थंडसाठवणूक केंद्र उभारण्याचेही नियोजन आहे.

## जाहीर नोटीस

**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**

७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१, दूरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२
E-mail - sdopune@gmail.com

क्र. मृत्यू/रजि./एसआर/२३४/२०२४

**१) श्री. आनंद भिमा कलाल**
रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे **- अर्जदार**

**विरुद्ध**

**२) जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी/निबंधक, ग्रामपंचायत उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे**
**- जाब देणार**

**विषय : जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. आनंद भिमा कलाल, रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे** (अपिलार्थी) यांनी त्यांचे **स्वत: यांचा, जन्म दि. २२/१०/२००६ रोजी मौजे उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे येथे** झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीसी प्रसिद्धी झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत** या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याच्या कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. १७/०४/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण : पुणे, दिनांक : १७/०४/२०२५.

**(शिक्का)** **(डॉ. यशवंत माने)**
**उपविभागीय दंडाधिकारी, हवेली, उपविभाग पुणे**






पुणे प्राईम न्यूज



## संक्षिप्त

### कुणाल कामराने विधान भवनातील राड्याची सादर केली नवीन कविता



मुंबई, ता. १८ : उमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक कविता सादर करणाऱ्या कॉमेडियन कुणाला कामराने देखील प्रतिक्रिया दिली आहे. कुणाल याने पुन्हा एकदा एक कविता सादर करत सरकाराला डिवचण्याचे काम केले आहे. कुणालने हाणामारीच्या घटनेचा व्हिडीओ एडिट करून त्याच्या एक्स अकाऊंटवरून शेअर केला आहे. या व्हिडिओच्या मागे कवितेचे बोल ऐकू येत असून, या कवितेच्या माध्यमातून महायुती सरकारवर पुन्हा निशाणा साधला आहे. कॉमेडियनने शेअर केलेल्या व्हिडिओत 'होंगे नंगे चारो ओर, करेंगे दंगे चारो ओर.. असं गाणं ऐकू येत आहे. या व्हिड्रीओखाली त्याने 'कायदा मोडणारेअसे कॅप्शन देखील दिले आहे. कॉमेडियनच्या याच व्हिडीओवर सध्या नेटकऱ्यांनी कमेंट्सचा भडीमार केला आहे. दरम्यान, आव्हाड आणि पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर याचे पडसाद राज्याच्या राजकारणातही उमटल्याचे पहायला मिळत आहे. व्हिडिओमध्ये कार्यकर्ते एकमेकांचे कपडे फाटेपर्यंत मारहाण करताना दिसत आहेत.

# पुण्यात पाच नवीन पोलीस ठाणी

## लोहगाव, नऱ्हे, मांजरी, लक्ष्मीनगर, येवलेवाडी ठाण्याची हद्द निश्चित

**पुणे, ता. १८ :** वेगाने वाढणाऱ्या पुणे शहराची सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी पुणे पोलीस दलाने एक मोठा प्रस्ताव गृहविभागाला सादर केला आहे. शहराचा विस्तार आणि वाढत्या गुन्हेगारीमुळे निर्माण झालेला ताण कमी करण्यासाठी पाच नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यासोबतच, अतिरिक्त पोलीस उपायुक्तांची गरज असल्याचेही पोलिसांनी या प्रस्तावात नमूद केले आहे.

पुणे शहर मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे, त्यामुळे सध्याची काही पोलीस ठाणी भौगोलिकदृष्ट्या खूप मोठी झाली आहेत. या समस्येवर उपाय म्हणून, पुणे पोलिसांनी लोहगाव, नऱ्हे, मांजरी, लक्ष्मीनगर आणि येवलेवाडी या ५ महत्त्वाच्या भागांमध्ये नवीन पोलीस ठाणी सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. हे नवीन ठाणी सध्याच्या काही मोठ्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून तयार केली जातील.




प्रस्तावानुसार, पुणे शहरातील काही महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून ही नवीन ठाणी अस्तित्वात येतील. यामुळे प्रत्येक भागातील पोलिसांचे कार्यक्षेत्र लहान होईल आणि नागरिकांना जलद सेवा मिळण्यास मदत होईल:

विमानतळ पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र कमी होऊन त्यातून स्वतंत्र लोहगाव पोलीस ठाणे तयार होईल. येरवडा पोलीस ठाण्याला विभागून लक्ष्मीनगर येथे नवीन पोलीस ठाणे तयार होईल. सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे विभाजन होऊन नऱ्हे येथे नवीन ठाणे कार्यान्वित होईल. कोंढवा आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून येवलेवाडी येथे स्वतंत्र पोलीस ठाणे सुरू करण्याची योजना आहे. तर, हडपसर पोलीस ठाण्याचे क्षेत्र विभागून मांजरी येथे नवीन पोलीस ठाणे स्थापन केले जाईल.

दरम्यान, वर्षभरात पुणे शहरात सात नवीन पोलीस ठाणी सुरू करण्यात आली होती. यामुळे पोलिसांचे काम अधिक सोपे झाले असून, नागरिकांनाही तक्रारी नोंदवणे सोपे झाले आहे. पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी ही एक मोठी समस्या आहे. तसेच, शहरातील व्हीआयपी लोकांच्या वाढत्या दौऱ्यांमुळे वाहतूक पोलिसांवर कामाचा ताण वाढत आहे.

दरम्यान, वाहतूक पोलिसांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे एक हजार जवान पाहिजेत, असा प्रस्तावही पुणे पोलिसांनी राज्य सरकारला पाठवला आहे.

# कौटुंबिक कारणावरून चुलत भावाचा जीव घेण्याचा प्रयत्न

**पुणे, ता. १८ :** पुण्यातील पर्वती दर्शन भागात सोमवारी सायंकाळी एक धक्कादायक प्रकार घडला. मुलगी घरातून निघून गेली याचा राग मनात धरत चुलत भावाने दुसऱ्या भावाच्या डोक्यात सिमेंटचा ब्लॉक घालून त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आदेश संजय काळे (वय ४१, रा. पर्वती दर्शन) असे आहे. तर, या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले व्यक्तीचे नाव अमित काळे (वय ४०, रा. पर्वती दर्शन) आहे. जखमीच्या आई सुरेखा सुरेश काळे (वय-५४) यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदेश आणि अमित हे चुलत भाऊ असून ते शेजारी राहतात. आदेश काळे यांची मुलगी काही कारणास्तव घरातून निघून गेली होती. या घटनेनंतर आदेश काळे रस्त्यावर येऊन मोठमोठ्याने शिवीगाळ करत होते. यावर अमित काळे यांनी त्यांना विचारले, तु कशाला शिव्या देतोस?

या प्रश्नाचा राग आल्याने आदेश काळे यांनी अमित याला जबाबदार ठरवत रस्त्यावर पडलेला सिमेंट ब्लॉक उचलून थेट त्याच्या डोक्यात मारला. यामध्ये अमित काळे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर पर्वती पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी आदेश काळे याच्याविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी माहिती देताना सांगितले की, आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# शासकीय वसतिगृहातील प्रवेशाबाबत वेळापत्रक जाहीर

**विशाल भालेराव**

खडकवासला ता. १८ : समाज कल्याण आयुक्तालयामार्फत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता शासकीय वसतिगृह प्रवेशप्रकिया https://hmas.mahait.org संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने होणार असून प्रवेशाबाबत अर्ज स्वीकारण्यासोबतच याद्या अंतिम करण्याबाबतचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.




शालेय आणि इयत्ता ११ वी व १२ वी विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी १७ जुलै रोजीपर्यंत अर्ज करावा. २१ जुलै रोजी प्रवेशाबाबतची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल. बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी २१ जुलैपर्यंत अर्ज करावा. या विद्यार्थ्यांची २५ जुलै रोजी प्रवेशाबाबत अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाअंतर्गत जिल्ह्यात १४ मुलांची व १० मुलींची अशी मागासवर्गीय मुलां-मुलींची २४ शासकीय वसतिगृहे आहेत. पुणे व पिंपरी-चिचवड शहरामध्ये एकूण १२ शासकीय वसतिगृहे असून त्यापैकी मुलांची ८ व मुलींची ४ वसतिगृहे आहेत. तसेच १२ शासकीय वसतिगृहे ही तालुकास्तरावर आहेत. इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# खडकवासला भागात लम्पी आजाराची साथ

**विशाल भालेराव**

खडकवासला, ता. १८ : खडकवासला, किरकटवाडी, वारजेसह हवेली तालुक्यात पुन्हा लम्पी आजाराची साथ सुरू झाली आहे. दुभत्या गायी, बैल, वासरे साथीमुळे गोठ्यात पडून आहेत. हवेली तालुक्यात ५५ जनावरांना या आजाराची लागण झाली आहे. सरकारी पशुवैद्यकीय अधिकारी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांकडून जनावरांवर महागडे उपचार करावे लागत आहेत.



तालुक्यात खडकवासला, वारजे, किरकटवाडी, सिंहगड परिसरात लम्पीची लागवण झालेली जनावरे आढळली असून, हवेली विशेषतः दुभत्या गायींना प्रादुर्भाव अधिक आहे. खडकवासला येथील तानाजी रघुनाथ मते यांच्या गाय आणि बैलाला लम्पीची लागण झाली आहे.

खडकवासला काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल मते म्हणाले, गावात सरकारी पशुवैद्यकीय दवाखाना असूनही सरकारी पशुवैद्यकीय अधिकारी गावात फिरकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांकडून जनावरांवर महागडे उपचार करावे लागत आहेत. मात्र, त्यांच्याकडे आवश्यक लस, औषधे नसल्याने जनावरे दगावण्याची शक्यता आहे.

हवेली तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रकाश काळे म्हणाले की, खडकवासला येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात एक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यासह दोन डॉक्टर आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन तातडीने संबंधित डॉक्टरांना सूचनाही दिल्या आहेत. सिंहगड भागासह हवेली तालुक्यात सध्या लम्पीची लागण झालेली ५५ जनावरे आहेत. त्यांच्यावर सरकारी दवाखान्याच्या मार्फत उपचार सुरू आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# प्राईम लाईफ

## आरोग्यासाठी महत्त्वाचे ग्लूटाथियोन वाढवण्यासाठी 'हे' पदार्थ खा



**पुणे, :** सध्या आरोग्य आणि निरोगी जीवनाबद्दल जागरूकता वाढत आहे. अशात, शरीराला डिटॉक्सिफाई करणारे आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे ग्लूटाथियोन हे महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट चर्चेत आले आहे. हे आपल्या शरीरात नैसर्गिकरित्या तयार होते, परंतु काही विशिष्ट पदार्थांच्या सेवनाने याची पातळी वाढवता येते.

ग्लूटाथियोन कशातून मिळते? : व्हिटॅमिन सी ग्लूटाथियोनची पातळी टिकवून ठेवण्यास मदत करते. संत्रा, लिंबू, मोसंबी यांसारखी फळे, तसेच टोमॅटो हे व्हिटॅमिन सी चे उत्तम स्रोत आहेत. सेलेनियम हे ग्लूटाथियोनच्या उत्पादनासाठी आवश्यक आहे. चिकन, मासे, चीज, ब्राऊन राईस आणि ब्राझील नट्स यातून सेलेनियम मिळते. पालक, शतावरी आणि एवोकाडो हे ग्लूटाथियोनचे थेट स्रोत मानले जातात. पालक कच्चा खाल्ल्यास अधिक फायदेशीर ठरतो. तर टरबूज आणि स्ट्रॉबेरी सारखी फळे देखील ग्लूटाथियोन वाढवण्यासाठी उपयुक्त आहेत.

भारतीय मसाल्यांमध्ये महत्त्वाच्या असलेल्या हळदीमध्ये असलेले 'कर्क्युमिन' हे शरीरात ग्लूटाथियोनचे उत्पादन वाढवण्यासाठी मदत करते, विशेषतः यकृताच्या कार्यक्षमतेला सुधारतात. केवळ खाण्यापिण्यावरच अवलंबून न राहता, ग्लूटाथियोनची पातळी वाढवण्यासाठी चांगल्या सवयीही महत्त्वाच्या आहेत.

या पदार्थांचा आहारात समावेश केल्याने आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब केल्याने शरीरातील ग्लूटाथियोनची पातळी नैसर्गिकरित्या वाढवता येते, ज्यामुळे एकंदर आरोग्य सुधारण्यास मदत होते.



## उत्तम आरोग्यासाठी 'शांत झोप' आवश्यक; अपुरी झोप आरोग्यासाठी ठरते घातक

**पुणे :** आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकदा कामाच्या तणावामुळे किंवा सोशल मीडियाच्या वापरामुळे रात्री उशिरापर्यंत जागे राहण्याची सवय अनेकांना लागली आहे. मात्र, रात्रीची शांत आणि पुरेशी झोप ही केवळ थकवा घालवण्यासाठीच नाही, तर आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी किती महत्त्वाची आहे, हे आता विविध संशोधनांमधून समोर येत आहे. अपुऱ्या झोपेमुळे गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

शरीरातील 'सर्केडियन रिदम' आणि 'होमिओस्टॅसिस' या दोन महत्त्वाच्या यंत्रणा झोपेचे नियमन करतात. ही यंत्रणा आपल्या शरीराचे तापमान, चयापचय आणि हार्मोन्सचे संतुलन नियंत्रित करते. यामुळे आपल्याला वेळेवर झोप येणे आणि सकाळी वेळेत जाग येणे, या क्रिया सुरळीत होतात.ही यंत्रणा शरीराच्या झोपेच्या गरजेवर लक्ष ठेवते. आपण जितकेजास्त वेळ जागे असतो, तितकी झोपेची भूक वाढत जाते आणि त्यानंतर शरीर जास्त वेळ आणि गाढ झोप घेण्याची मागणी करते.

रात्रीच्या वेळी मेंदू एका कॉम्प्युटरप्रमाणे 'रिस्टार्ट' होतो. दिवसा जमा झालेला अनावश्यक कचरा आणि थकवा तो झोपेच्या वेळी दूर करतो. यामुळे मेंदू ताजेतवाने होतो आणि सकाळी आपण अधिक सक्रिय व एकाग्रतेने काम करू शकतो.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते: पुरेशी झोप रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते, ज्यामुळे शरीर लहान-मोठ्या संसर्गाशी आणि आजारांशी लढण्यास अधिक सक्षम होते. झोपेचा संबंध शरीरातील चयापचयाशी असतो. अपुऱ्या झोपेमुळे हार्मोन्सचे संतुलन बिघडते, ज्यामुळे भूक वाढते आणि अनावश्यक खाण्याची इच्छा होते, परिणामी वजन वाढण्याची शक्यता असते.

कमी झोपेमुळे हृदयविकार, उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो. नियमित आणि पुरेशी झोप हृदयाला निरोगी ठेवण्यास मदत करते. झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिडेपणा, तणाव, चिंता आणि नैराश्य येऊ शकते. चांगली झोप मूड सुधारते आणि मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवते.

झोप मेंदूला माहिती साठवण्यास आणि स्मृती मजबूत करण्यास मदत करते. पुरेशी झोप घेतलेल्या व्यक्ती अधिक लक्ष केंद्रित करू शकतात आणि त्यांची कार्यक्षमताही चांगली असते. अपुऱ्या झोपेमुळे मधुमेह आणि दीर्घकालीन आजार होण्याचा धोका वाढतो. वैद्यकीय परिस्थिती, औषधे, तणाव, झोपेचे वातावरण आणि आहार हे घटक झोपेवर परिणाम करतात. रात्री उशिरा मोबाईल किंवा टीव्हीचा वापर केल्याने मेंदूला दिवसाचा संदेश मिळतो आणि झोप येत नाही.

डॉक्टरांनुसार, प्रौढ व्यक्तींनी दररोज किमान ७ ते ८ तास शांत झोप घेणे आवश्यक आहे. झोपेचे एक निश्चित वेळापत्रक ठेवणे, झोपण्यापूर्वी स्क्रीनचा वापर टाळणे, शांत आणि अंधाऱ्या वातावरणात झोपणे तसेच नियमित व्यायाम करणे हे चांगल्या झोपेसाठी महत्त्वाचे उपाय आहेत. झोपेची कमतरता हा एक 'सायलेंट किलर' असून, त्याचे दीर्घकाळ चालणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी झोपेला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

# गुटखा बंदी कायदा नावालाच खुलेआम विक्री सुरु

**विशाल भालेराव**

खडकवासला, ता. १८ : जिल्ह्यात तंबाखू, गुटखा विक्री बंदीचा कायदा नावालाच दिसून येत आहे. गावागावांत खुलेआम पानटपऱ्यांवर तंबाखू व गुटख्याची विक्री होत आहे. एवढेच नव्हे तर शाळा परिसरालगत ही दुकाने खुलेआम सुरू आहेत. त्यामुळे प्रशासन धडक मोहीम राबविणार काय, असा प्रश्न आहे.

राज्यात गुटखा बंदीचा निर्णय झाला. पण ना त्याची कडक अंमलबजावणी झाली, ना गुटखा विक्री थांबली. शहर किंवा ग्रामीणमधील पानटपरी, दुकानांमध्ये गुटख्याची विक्री होत आहे. गुटखा विक्री होत असतानाही कारवाई होताना दिसत



नाही. स्थानिक पोलिसांची बघ्याची भुमिका दिसते. गुटखा येतोच कसा, या प्रश्नाचे ठाम उत्तर पोलीस अधिकारी देऊ शकत नाहीत.

पुणे आणि पुणे परिसराजवळील सिंहगड रोड, सातारा रोड,खडकवासला,सिंहगड, खेड शिवापूर ,पानशेत इतर परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्रीला येतो. गुटखा बंदीनंतर अनेकांनी मावा विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. त्यातूनच गुटख्याची विक्री सुरुवातीला चोरून केली जात होती. आता सर्रासपणे केली जात आहे.

तरुणांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवून निरोगी, सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी हातभट्टी दारू, गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध लावण्यात आले; पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे कायद्याचे पालन होत नाही. जिल्ह्यात शहरच नव्हे, तर ग्रामीण परिसरात गुटखा विक्री सर्रासपणे पानटपरी, दुकानांमध्ये होते. गुटखा विक्रीसाठी मोठी साखळी कार्यरत आहे. ही साखळी तोडल्यानंतरच गुटखा विक्री कमी होण्यास मदत होणार आहे. कारवाईची धडक मोहीम हाती घेणे गरजेचे आहे.

शरीरावर परिणाम, मात्र नाद सुटता सुटेना तंबाखू, गुटख्याचे परिणाम अनेकांच्या आरोग्यावर झाले आहेत. गुटखा खाणाऱ्यांचे तोंड उघडत नाही. अनेकांना व्यवस्थित जेवणही करता येत नाही. आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. तरुणांच्या आरोग्यावर तंबाखू, गुटख्याचे सर्वाधिक वाईट परिणाम दिसत असल्याचे कर्करोगतज्ज्ञ सांगतात. तरीपण, गुटखा, मावा खाणाऱ्यांना त्याचा नाद सुटता सुटत नसल्याचे दिसून येत आहे.

भाजपाचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी यासंबधी प्रश्न मांडला सरकार फक्त विकणाऱ्यांवर कारवाई करते. हा गुटखा येतो कुठुन त्यामागे कोणाचा आशिर्वाद आहे. यात पोलिस, एफडीए चे अधिकारी आणि वेगवेगळे दलाल यांचा समावेशा असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यावर मंत्री झिरवळ म्हणाले सध्याच्या कायदा वर्षभरासाठीच लागू केला जातो. यामध्ये आता बदल करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे संबंधित आरोपीना मोका लावता येईल काय याबबत विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन घेउन कार्यवाही केली जाईल.

> व्यसन हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे. तंबाखू, गुटखा खाण्याची तलब सुटता सुटत नाही. परंतु, प्रयत्न केले तर नक्कीच यश मिळते. तंबाखूचे व्यसन कर्करोगाला आमंत्रण देणारे आहे. कर्करोगाचा शेवट जीव गमावल्यानंतर होतो. त्यामुळे तरुणांनी व कुटुंबीयांनी तंबाखूच्या व्यसनापासून दूर राहावे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या पाकिटावर त्याच्या दुष्परिणामांची माहिती छायाचित्राद्वारे दिली जाते.
> - **डॉ. शनया बोरा,** मनोविकारतज्ज्ञ,पुणे

### अवैध साखळी तोडण्याची गरज

अन्न व औषध प्रशासन, तसेच पोलिस विभागाकडून कित्येकदा कारवाया केल्या जातात. मात्र, त्यानंतरही त्यांची आवक व विक्री बंद होताना दिसत नाही. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची आयात व विक्री यांची मोठी साखळी असून, ती तोडण्यासाठी कठोर कारवायांची गरज आहे. गुटख्याची तस्करी व विक्री करणाऱ्यांवर या पुढे मोका कायद्यातर्गत कारवाई केली जाईल त्या संदर्भात विधी व न्याय विभागाचे मत विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल आशी घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी विधान परिषदेत केली.

# दौंडचे माजी आमदार रमेश थोरात करणार अजित पवार गटात प्रवेश?

**पुणे, ता. १८ :** दौंडचे माजी आमदार आणि पुणे जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक रमेश थोरात हे लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती पुढे आली आहे. विधिमंडळाचे चालू अधिवेशन संपल्यानंतर रमेश थोरात हे अधिकृतपणे अजित पवारांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करणार असल्याची माहिती मिळाली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून रमेश थोरात यांच्या राजकीय भूमिकेवर चर्चा सुरू होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी शरद पवार यांच्या गटात प्रवेश करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (तुतारी चिन्ह) उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. मात्र या निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर आता ते पुन्हा अजित पवारांच्या गटाकडे वळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी अजित पवार आणि रमेश थोरात यांच्यात पुण्यात एक महत्त्वाची भेट झाली होती. त्यानंतर ते दोघे एकाच वाहनातून ि रताना दिसले होते, त्यामुळे तालुक्यात रमेश थोरात यांचा पक्षप्रवेश निश्चित असल्याच्या चर्चांना उधाण आले होते.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर माजी आमदार रमेश थोरात म्हणाले की, तालुक्यातील कार्यकर्त्यांशी सल्लाम सलत सुरू आहे. त्यांच्या मतानुसारच पुढील निर्णय घेतला जाईल. अजित पवार यांच्याशी माझी मैत्री जुनी आणि ओळख सर्वश्रुत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सकारात्मक निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

दौंड तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून कुल विरुद्ध थोरातअशीच राजकीय समीकरणे दिसत आली आहेत. यावर भाष्य करताना थोरात म्हणाले, पक्ष कोणताही असो, ताकद मात्र कुल आणि थोरात यांच्या भोवतीच केंद्रित राहिलेली आहे. सध्या तरी तालुक्यात हेच दोन गट प्रभावशाली आहेत. या घडामोडींमुळे दौंड तालुक्यात पुन्हा एकदा राजकीय रंगत वाढली असून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ही पुनर्बांधणी महत्त्वाची ठरू शकते.

# मोहम्मदवाडीचे नाव बदलून महादेववाडी करण्याची मागणी



**पुणे, ता. १८ :** हडपसर परिसरातील मोहम्मदवाडी या भागाचे नाव बदलून महादेववाडी करावे, अशी मागणी भाजपचे विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी केली आहे. पावसाळी अधिवेशनात पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन अंतर्गत त्यांनी हा मुद्दा मांडण्यात आला आहे.

टिळेकर यांनी विधानसभेत सांगितले की, महादेववाडी हे नाव या भागाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भावनांशी जुळणारे आहे. १९९५ मध्ये स्थानिक ग्रामस्थांनी एकमताने मोहम्मदवाडीचे नाव महादेववाडी करण्याचा ठराव केला होता. त्यानंतर १९९७ मध्ये हा भाग पुणे महापालिकेत समाविष्ट झाला आणि त्यानंतर नामांतर प्रक्रियेवर विराम लागला.

महापालिकेच्या नाव समितीकडे हा प्रस्ताव दिला गेला होता, मात्र नामांतराचे अधिकार महापालिकेकडे नसल्यामुळे हा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारकडे पाठविण्यात आला. अलीकडेच, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थांनी याच मागणीसाठी आंदोलन केले होते. आता आमदार टिळेकर यांनी हा मुद्दा थेट विधिमंडळात मांडल्याने या मागणीला गती मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या प्रस्तावाला काही स्थानिक नागरिक व राजकीय पक्षांकडून विरोध करण्यात येत आहे. मोहम्मदवाडी हे नाव अनेक वर्षांपासून आहे, आणि आता नाव बदलणं योग्य नसल्याचं मत विरोधक मांडत आहेत. अशातच आता टिळेकर यांच्या या प्रस्तावावरुन नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

# एस. टी. बसच्या पाठीमागे पळताना वयोवृद्ध व्यक्तीचा मृत्यू

**दौंड, ता. १८ :** पाटस येथील एसटी बस स्थानकावर बसच्या मागे धावताना एक वयोवृद्ध व्यक्ती अचानक खाली पडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

डॉक्टरांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, त्यांचा मृत्यू हार्ट अटॅकमुळे झाला असावा असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. पुरुषोत्तम रावसाहेब आटोळे (रा. हादगाव, ता. कर्जत) असे असून, ते आपल्या मुलीकडे नंदादेवी (ता. दौंड) येथे जात होते. सकाळी सुमारे साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.




मिळालेल्या माहितीनुसार, पाटस बसस्थानकावर ते बसची वाट पाहत होते. दरम्यान, ते ज्या बसमध्ये चढणार होते, ती बस पुढे निघून गेली. ती पकडण्यासाठी आटोळे धावत गेले असताना ते रस्त्यावर कोसळले. आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने टोल नाका रुग्णवाहिकेला फोन केला. त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

रुग्णवाहिका चालकाने ही माहिती पाटस पोलीस ठाण्यात दिली आणि आटोळे यांच्या मोबाईलमधून त्यांच्या नातेवाईकांनाही संपर्क केला. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी यवत ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेची माहिती आटोळे यांचे जावई हनुमंत कोकणे यांनी पाटस पोलिसांना दिली असून, पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

# बारामतीत बँक ऑफ बडौदाच्या प्रबंधकाने बँकेतच संपवले जीवन

**बारामती, ता. १८ :** बारामतीमधील भिगवण रोडवरील बँक ऑफ बडोदाच्या शाखा व्यवस्थापकाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. व्यवस्थापक शिवशंकर मित्रा (वय-५२) यांनी गुरुवारी (ता. १७) रात्री बँकेच्या शाखेतच गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. शिवशंकर मित्रा हे मूळचे उत्तर प्रदेशचे रहिवासी होते.



शिवशंकर मित्रा यांनी लिहिलेल्या चिठ्ठीनुसार त्यांनी पाच दिवसांपूर्वीच बँकेकडे अतिरिक्त दबाव सहन होत नसल्याने स्वेच्छानिवृत्ती मागितली होती. मात्र बँकेच्या वरिष्ठ स्तरावरून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर गुरुवारी रात्री त्यांनी आत्महत्या केली असल्याचं कारण समोर येत आहे. मात्र पोलीस खात्याकडून याला अद्याप कोणताही दुजोरा मिळालेला नाही.

शिवशंकर मित्रा यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत नमूद केले की, मी शिवशंकर मित्रा, मुख्य प्रबंधक बँक ऑफ बडोदा बारामती, मी आज बँकेच्या अतिरिक्त दबावाच्या कारणामुळे आत्महत्या करत आहे. माझी बँकेकडे विनंती आहे की, कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त दबाव टाकू नका. सर्वांना आपापल्या जबाबदारीची पूर्णपणे जाणीव आहे आणि ते १०० टक्के आपले योगदान देत असतात.

मी पूर्णपणे शुद्धीत असताना आणि स्वतःच्या इच्छेने आत्महत्या करत आहे. त्याच्यामध्ये माझ्या कुटुंबाची कोणतीही चूक नाही. कोणालाही जबाबदार धरू नये. मी फक्त बँकेच्या प्रचंड दबावामुळे आत्महत्या करत आहे. पत्नी प्रिया यांना उद्देशून त्यांनी, प्रिया, मला माफ कर. माही मला माफ कर! असे त्यांनी पत्नी प्रिया आणि मुलगी माही यांना लिहिलेलं आहे. शक्य झाल्यास माझे डोळे दान करावेत, अशी देखील इच्छा शिवशंकर मित्रा यांनी व्यक्त केली आहे.

# आमिर खानची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न; पुण्यातील तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**सातारा, ता. १८ :** खासदार उदयनराजे भोसले यांच्या नावाचा गैरवापर करत बॉलिवूड अभिनेते आमिर खान यांची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात पुण्यातील एका तरुणाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित तरुणाचा शोध घेण्यासाठी शाहूपुरी पोलिसांची एक टीम पुण्याकडे रवाना झाली आहे.



या प्रकरणात अमानत शेख (वय -३१, रा. पुणे) या तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून आमिर खान यांना थेट फोन करून मी खासदार उदयनराजे भोसले बोलतोय असं भासवत त्या व्यक्तीने एक मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली जात असल्याचे सांगितले. त्यासाठी 'चॅरिटी करा' अशी मागणी करण्यात आली. इतकंच नाही, तर आमिर खान यांच्या स्वीय सहायकाशी देखील फोन व मेसेजद्वारे संपर्क साधून, संस्थेसाठी फंड डोनेट करण्याचा आग्रह करण्यात आला.

या प्रकारानंतर अभिनेते आमिर खान यांनी प्रत्यक्ष खासदार उदयनराजे भोसले यांना पत्र लिहून विचारणा केली. त्यावर उदयनराजेंनी चॅरिटीसाठी मी कधीच असा कोणताही संपर्क साधलेला नाही असे स्पष्ट सांगितले. यानंतर आमिर खान यांना फोन व मेसेज करणारी व्यक्ती नेमकी कोण, हे शोधण्यासाठी उदयनराजेंचे कार्यकर्ते पंकज चव्हाण यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रार दाखल होताच पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांनी तत्काळ तपास सुरू केला. संबंधित व्यक्तीचा मोबाईल नंबर ट्रुकॉलरवर पाहिला असता त्यावर 'खासदार उदयनराजे भोसले' असं नाव झळकत होतं. मात्र, पोलिस तपासात त्या व्यक्तीचं खरे नाव अमानत शेख असल्याचं निष्पन्न झालं असून तो पुण्यामध्ये वास्तव्यास आहे.

दरम्यान, अमानत शेख याने आमिर खान यांच्याकडून प्रत्यक्ष पैसे उकळले नसले तरी खासदार उदयनराजे भोसले यांच्या नावाचा वापर करून फसवणुकीचा प्रयत्न केल्याने ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. त्याने यापूर्वीही अशाच प्रकारचे प्रयत्न केले आहेत का, याचा तपास सध्या सुरू आहे. पोलिसांनी सांगितलं की, त्याला ताब्यात घेतल्यानंतर अधिक माहिती समोर येईल.

# महाविकास आघाडीत विरोधी पक्षनेते पदावरून रस्सीखेच

## ठाकरे गट ठाम, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस कडून प्रयत्न सुरु

**मुंबई, ता. १८ :** विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पदावरून महाविकास आघाडीमध्ये एकमत होत नसल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनाचा अखेरचा टप्पा सुरू असताना, ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांचा कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपणार आहे. त्यांच्या जागेवर काँग्रेसचा आमदार विरोधी पक्षनेता व्हावा, असा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आग्रह आहे.




शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे तिन्ही पक्ष हे महत्त्वाचे पद आपल्याकडे यावे यासाठी राजकीय प्रयत्न करत आहेत. विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदासाठीही ठाकरे गट आग्रही आहे. सूत्रांनुसार, ठाकरे गटाने भास्कर जाधव यांचे नाव विरोधी पक्षनेता म्हणून विधानसभा अध्यक्षांकडे दिले आहे. मात्र, अध्यक्षांनी अजूनही यावर कोणताही निर्णय घेतला नाही.

दरम्यान, काँग्रेसकडून माजी मंत्री सतेज पाटील यांचे नाव चर्चेत असून, त्यांचा दावा मजबूत असल्याचे बोलले जात आहे. विधान परिषदेत ठाकरे गटापेक्षा काँग्रेसचे आमदार जास्त आहेत. दुसरीकडे ठाकरे गटाचे ज्येष्ठ आमदार अनिल परब हे देखील परिषदेतील विरोधी पक्षनेते पदासाठी इच्छुक आहेत.

सरकारवर दबाव आणण्यासाठी एकत्र येण्याऐवजी, तिन्ही पक्षांमध्ये विरोधी पक्षनेते पदावरून अंतर्गत स्पर्धा सुरू असल्याचे सत्ताधारी पक्षाने म्हंटले आहे. दरम्यान, महाविकास आघाडीतील कोणत्याही एका पक्षाकडे विरोधी पक्षनेते पद मिळवण्यासाठी पुरेशी सदस्य संख्या नाही, असा मुद्दा सत्ताधारी पक्षाने उपस्थित केला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत यावर निर्णय न झाल्यास, ही अंतर्गत रस्सीखेच महाविकास आघाडीच्या एकजुटीलाही धोका निर्माण करू शकते.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी योग्य वेळी निर्णय घेणार असल्याचे सांगितले होते. अजय चौधरी आणि सुनील प्रभू यांचीही या पदासाठी इच्छा असल्याची चर्चा आहे.या सगळ्या घडामोडींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसनेही आपले डावपेच सुरू केले आहेत.